| MHAU060008872023 | **नियमीत दिवाणी दावा नं.३५०/२०२३ मधील निशाणी क्र.१५ खालील आदेश.**<br>**सांडु साहेबराव सुरे वि. आण्णा साहेब जगन्नाथ जाधव** |
|---|---|

१. अभिलेखाचे अवलोकन करता असे लक्षात येत आहे की,वादींनी प्रस्तुत दावा रक्कम वसुली करीता दाखल करण्यात आलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, समन्स अहवाल दाखल झाला असुन त्यात दिनांक ११.०६.२०२४ रोजी प्रतिवादीची पत्नी या प्रत्यक्ष हजर भेटले व त्यांनी प्रतिवादीच्या वतीने समन्स स्वीकारले असुन तशा सहया केलेल्या आहेत.

२. दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ अंतर्गत क्रम ५ नियम १५ प्रमाणे घरातील सुज्ञ व्यक्तीने समन्स स्वीकारले असता दावा समन्सची बजावणी झाल्याचे म्हणता येईल.

३. प्रस्तुत अर्ज वादींनी प्रतिवादीविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यानंतर दिनांक १९.०६.२०२४, १९.०७.२०२४, ०३.०८.२०२४, ०४.०९.२०२४, १३.०९.२०२४, १३.११.२०२४, या तारखांवर प्रतिवादी हजर झाले नाही किंवा त्यांनी प्रकरणात कोणतेही पाउले उचलली नाहीत. आजरोजी प्रतिवादींना पुकारले असता प्रतिवादी गैरहजर. अभिलेखावर कोणताही अर्ज नाही. प्रतिवादींवर योग्य त्या रित्या समन्सची बजावणी झालेली आहे व त्यांनी प्रकरणात हजर न राहुन त्यांचा निरुत्साह दर्शविलेला आहे. त्यामुळे अधिक वेळ न दवडता दिवाणी प्रक्रिया संहीता १९०८ अंतर्गत क्रम ९ नियम ६ प्रमाणे त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला आहे.

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2025.01.03 17:05:43 +0530

**दिनांक –०२/०१/२०२५.**

**(काटकर विजया एन.एस)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**कन्नड.**

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र / आदेश या मधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र / आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :- | आर.एस. टाकळकर |
| न्यायालयाचे नांव | :- | **काटकर विजया एन.एस.**<br>२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),<br>तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड. |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | :- | ०२.०१.२०२५ |
| न्यायिक अधिकाऱ्यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | :- | ०२.०१.२०२५ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :- | ०२.०१.२०२५ |
| निकालपत्रावर डिजीटल स्वाक्षरी केलेचा दिनांक | :- | ०२.०१.२०२५ |

---------------------------